

मुंबईतील एका महाविद्यालयात इंग्रजीच्या प्राध्यापक असलेल्या नीरजा यांनी कथा आणि कविता या दोनही प्रकारात साहित्यनिर्मिती केली आहे. 'निरर्थकाचे पक्षी' या कवितासंग्रहात स्त्री-समूहाच्या वाट्याला आलेले दुय्यमत्व, विविध कारणांनी होणारे स्त्रियांचे शोषण आणि उलगडत जाणारा स्त्रीच्या स्वत्वाचा प्रवास या तीनही प्रमुख घटकांची अभिव्यक्ती आहे. शिवाय, या कवितांना जागतिकीकरणाचा संदर्भ असल्याने त्यांना व्यापक अर्थपूर्णता लाभलेली आहे. शोषित व भरडली जाणारी, तरीही व्यवस्थेला जाब विचारून समर्थपणे पुढे जाणारी स्त्री या काव्यसंग्रहातून प्रत्ययकारी रूपात साकार होते.

**को**णतीही विशिष्ट अशी भूमिका नसण्याच्या काळात मी लिहायला सुरुवात केली. वेगवेगळ्या प्रकारचं माझं वाचन, माझं जगणं, ते जगताना पडत गेलेले प्रश्न आणि या प्रश्नांची उत्तरं शोधताना होणारी दमछाक या सर्वांचं प्रतिबिंब माझ्या 'निरन्वय' या संग्रहातील कवितेत उमटलं होतं. खूप वाचन केलं होतं मी. मराठीबरोबरच केलेल्या अमेरिकन आणि युरोपियन साहित्याच्या त्या वाचनानं मनात कल्लोळ दाटले होतेच. पण एकूणच जगण्यात आलेल्या निरर्थकत्वाची भावना कामूच्या 'आऊटसायडर'नं जास्तच गडद केली होती. इलियट, कामू, बेकेट, पिंटर, यांसारखे कवी, कादंबरीकार आणि नाटककार त्या काळात नेणीवेत जाऊन बसले ते कायमचे. अगदी अस्तित्ववादी बाण्यानं जगायला सुरुवात केली तरीही जगण्यातला निरर्थकपणा जाणवत राहिला. त्यामुळेच कदाचित आजही निरर्थकाचे ते पक्षी माझ्या मनात घिरट्या घालत असावेत.

माझ्यातली कवयित्री आणि कथाकार खरं तर एकाच काळात जन्माला आले. दोन-तीन महिन्यांच्या अंतरानं. कथेचा जन्म पहिला, मग कवितेचा. असं असलं तरी कथेच्या पाठीवर जन्माला आलेली कविता लाडकी होत गेली आणि कथेकडं थोडं दुर्लक्षच झालं. पुढं तर तिच्याकडे लक्ष द्यायला वेळच झाला नाही. अगदी कमी वेळ दिला तरी समाधानी असलेली आणि मनात जागा दिली तरी खूष होणारी कविताच माझ्या आजूबाजूला सतत वावरत राहिली.

माणूस जन्माला येताना कोणत्या भूमिका घेऊन येत नाही. आजूबाजूचं समाजवास्तव, ज्या वर्तमानात तुम्ही राहत असता ते वर्तमान, भूतकाळानं प्रगल्भ केलेल्या जाणीवा आणि भविष्याविषयीच्या अपेक्षा आपल्या जगण्याला व्यापून राहिलेल्या असतात. त्यातून नकळत एक जीवनदृष्टी तयार होत जातेच. मी स्वतः एकाच विचारधारेची कडवी समर्थक नाही. स्त्रीवाद, मार्क्सवाद, समाजवाद अशा विचारधारांतील अनेक गोष्टी माझी जीवनदृष्टी घडवत गेल्या. या विचारधारांतला माणसाला माणूस म्हणून वागवणारा, मानवतेकडे घेऊन जाणारा विचार मला जास्त भावतो. मी देव मानत नाही पण माझी माझ्या विचारांवर, कामावर, काही व्यक्तींवर श्रद्धा आहे. जी जी विचारधारा मानवतावादाकडे, समानतेकडे, धर्मनिरपेक्षतेकडे घेऊन जाते ती मला माझी वाटते.

कवीच्या अनुभवविश्वाचा आणि ज्या वास्तवात तो जगत असतो त्या वास्तवाचा परिणाम त्याच्या कवितेवर होत असतो. माझ्याही कवितेवर तो होत होताच. केवळ स्त्री म्हणूनच नाही तर एक व्यक्ती म्हणून या समाजात जगताना येणारे अनुभव तुमच्या नकळत तुमच्या कवितेतून व्यक्त व्हायला लागतातच. या समाजात जगताना मनात उठणारे हजारो प्रश्न तुमच्या अवकाशात वावटळीसारखे फिरत रहातात. माझ्या मनात तर खूपच प्रश्न होते. विशेषतः स्त्रीच्या जगण्याविषयीचे, तिच्या या समाजातील स्थानाविषयीचे प्रश्न मनात सतत उभे रहात होते. मी लहानपणी वाचलेल्या कथा-कादंबऱ्यातील नायिका या बऱ्याचशा पारंपरिक, समर्पित जीवन जगणाऱ्या होत्या. त्या तशाच असतात आणि आपल्यालाही तोच आदर्श घेऊन जगायचं आहे असं मनावर बिंबवणारा समाज आजूबाजूला होताच. पण अशा धारणा मनाला पटत नव्हत्या. काहीतरी चुकतं आहे असं वाटण्याच्या काळातच टॉलस्टॉयची 'ॲना कॅरनिना' वाचली आणि ती माझी सखीच होऊन गेली. आपल्याला एक व्यक्ती म्हणून नाकारलेल्या सुखाचा, आनंदांचा विचार करणारी; त्यासाठी समाजाच्या दृष्टीनं भरभरून असलेल्या सुखाला लाथ मारून बाहेर पडलेली टॉलस्टॉयची ॲना आणि इब्सेनची नोरा माझ्या आयुष्याला

## मर्यादा ओलांडून जाण्याचा प्रयत्न करीत आहे

माझ्या कवितेत आणि कथेत येणारी ही स्त्री स्वतःच्या जगण्यावर भाष्य करणारी आहेच;
पण ज्या समाजात ती राहते त्या समाजाच्या मानसिकतेचा विचार करतानाच
तो बदलण्याचा प्रयत्न करणारी स्त्री आहे. प्रत्येक वेळी ती यशस्वी होतेच असं नाही;
पण ती प्रयत्न करते. माझ्या कवितेत येणारं माझ्या आजूबाजूचं जग हे स्त्रीकेंद्री आहेच,
पण त्यापलीकडेही एक वेगळं जग आहे याची कल्पना मला आहे.
अलीकडे माझ्या कवितेत ते जास्त व्यापकपणे यायला लागलंय असं मला स्वतःला वाटतंय.
विशेषतः गेल्या दहा-बारा वर्षांतली माझी कविता बदलली आहे.
तो बदल 'निरर्थकाचे पक्षी' मधील कवितेत ठळकपणे दिसून येतोय.

कलाटणी देणाऱ्या नायिका होत्या. या अशा नायिका मग मला गौरी देशपांडे, सानिया यांच्या कथा-कादंबऱ्यांतूनही भेटल्या. या सगळ्याजणी माझ्या अनुभवविश्वाचा महत्त्वाचा भाग झाल्या. आपल्या महाकाव्यांतून आलेल्या स्त्रिया माझ्या मनात प्रश्न उमटवू लागल्या. रामानं मातीत बुडवून टाकलेली सीता मला साद घालू लागली. आपलं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली आणि त्याचा सन्मान राखणारी द्रौपदी मला जवळची वाटू लागली. मग आपली व्यथा मांडण्यासाठी माझ्या नकळत ती माझ्या कवितेत आली. 'कुंडाच्या चार चौकटीतला मासा आंधळा झाला।तेव्हाच साऱ्या वाटा बंद झाल्या होत्या। अंधारात मी तरी कुठं धर्म शोधणार?। अधर्मालाच दिली सारी दाने/तेव्हापासून आजपर्यंत/किती वस्त्रहरणे! किती वस्त्रहरणे!' असं विधान करू लागली. हळूहळू माझी कविता बऱ्यापैकी आक्रमक होत गेली, विशेषतः लग्नानंतरच्या काळात. मुलगी असूनही जे मोकळेपण मी माझ्या घरात भोगलं होतं, ते या घरात नव्हतं. इथं केवळ सुनेलाच सून म्हणून वागवलं जात होतं असं नाही; तर मुलीलाही तिच्या स्त्रीत्वाशी जोडून येणाऱ्या भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पाडायचं वळण लावलं जात होतं. आणि मुख्य म्हणजे त्यात काही गैर आहे याचं भान त्यांना नव्हतं. या घरातले लोक वाईट अजिबात नव्हते. पण पूर्णपणे पारंपरिक भूमिका घेऊन जगणारे होते. त्यामुळे सून म्हणून, बायको म्हणून ज्या अपेक्षा आपल्याकडे केल्या जातात त्या माझ्याकडूनही केल्या गेल्या आणि त्या पूर्ण करण्याची जबाबदारी मीही आनंदाने उचलली. त्या काळात आपलं स्वतंत्र अस्तित्व सांभाळून चांगली सून बनता येतं का हे आजमावून पहाण्याचं ठरवलं होतं. पण चांगली सून बनण्यासाठी काय करावं लागतं याची कल्पना हळूहळू यायला लागली. पहिली गोष्ट म्हणजे तुमचं स्वतंत्र अस्तित्व विसरावं लागतं; त्याबरोबरच जगाच्या खिडक्या मिटून घ्याव्या लागतात; बाहेरचं वारं अंगावरून वाहतंय असं वाटलं तर स्वतःला घुसमटून टाकेपर्यंत झाकून घ्यावं लागतं; मनात उसळणाऱ्या साऱ्या प्रश्नांचं दफन करावं लागतं आणि हट्टानं आपल्यातली त्याग, समर्पणाची भावना दाखवून द्यावी लागते. हे सारं करण्याच्या प्रयत्नांत मनाची घुसमट होणं सहाजिक होतं. नोकरी करणाऱ्या बाईच्या काही गरजा असतात, त्या नोकरीच्याही काही जबाबदाऱ्या असतात हे आपल्याकडे आजही लक्षात घेतलं जात नाही; तर लेखिका म्हणून तिची निकड समजून घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. जे काही करायचं आहे - मग ती नोकरी असेल की लेखन - ते सारं आपल्या सून, बायको आणि त्याबरोबर आलेली सगळी नाती सांभाळून कर असा साधा सरळ दृष्टिकोन होता. त्यामुळे माझी वाचनाची, लेखनाची आणि मुख्य म्हणजे स्वतःचं स्वत्व जपण्याची निकड नवरा सोडून कोणालाही कळली नाही. अशा वेळी बाहेरच्या जगापासून पूर्णपणे तुटलेल्या मला आधार उरला तो शब्दांचा. मनातली घुसमट शब्दांत व्यक्त झाली आणि ती स्त्रीच्या पारंपरिक जगण्यावरच वार करायला लागली.

आज ज्या जगात मी राहते आहे त्या जगातली स्त्री माझ्या लेखनात सतत डोकावत असते. ही स्त्री जशी शोषित आहे; या व्यवस्थेत भरडली गेलेली आहे; तशीच ती ही व्यवस्था भेदून पुढे जाणारीही आहे. या व्यवस्थेला जाब विचारणारी, खंबीरपणे उभी राहणारी, स्वतःचा व्यक्ती म्हणून विचार करणारी, स्वतःला सतत तपासून पहाणारी, स्वतःचे निर्णय घेण्याएवढी सक्षम झालेली स्त्रीही आहे. माझ्या कवितेत आणि कथेत येणारी ही स्त्री स्वतःच्या जगण्यावर भाष्य करणारी आहेच पण ज्या समाजात ती राहते त्या समाजाच्या मानसिकतेचा विचार करतानाच तो बदलण्याचा प्रयत्न करणारी स्त्री आहे. प्रत्येक वेळी ती यशस्वी होतेच असं नाही; पण ती प्रयत्न करते. माझ्या कवितेत येणारं माझ्या आजूबाजूचं जग हे स्त्रीकेंद्री आहेच, पण त्यापलीकडेही एक वेगळं जग आहे याची कल्पना मला आहे. अलीकडे माझ्या कवितेत ते जास्त व्यापकपणे यायला लागलंय असं मला स्वतःला वाटतंय. विशेषतः गेल्या दहा-बारा वर्षांतली माझी कविता बदलली आहे. तो बदल 'निरर्थकाचे पक्षी' मधील कवितेत ठळकपणे दिसून येतोय.

आज संपूर्ण जगात होत असलेल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक उलथापालथी, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जगात होणारी प्रगती, रोज नव्यानं अंगावर आदळणारे बदल, जागतिकीकरण, त्याचे समाजमनावर होणारे परिणाम; धर्मभावना आणि जातिभावना दृढ करणारे विचार, त्यांचा समाजमनावर होणारा अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष परिणाम; त्यातून जन्माला आलेला दहशतवाद, दंगली, स्फोट, माणसांच्या मनात वाढत चाललेली असुरक्षिततेची भावना, जगण्यात आलेली अस्थिरता; त्यातून बाहेर येण्यासाठी तो शोधू पहातो आहे ते उपाय, त्याचं दैववादी होणं, अशा अनेक गोष्टी लेखकाच्या नेणिवेत जाऊन बसत असतातच. त्यांतील काही गोष्टी आनंददायक असल्या तरी अनेक गोष्टी त्याला अस्वस्थ करत असतात. या भल्या मोठ्या ग्लोबल गावात आपण रहात असलो तरी आपलं सारं जगणंच तुकड्या-तुकड्यांत विभागलं गेलं आहे. अशा विखंडित वास्तवात जगताना लेखक म्हणून त्याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न मीही करत असते. आज या क्षणी जगण्याच्या या साऱ्या गुंतागुंतीचा शोध घेणंही मला महत्त्वाचं वाटतं. मी ते करते आहे, आणि करत राहीनच. त्यात कितपत यशस्वी होईन माहीत नाही. पण माझ्यात असलेल्या मर्यादांना ओलांडून जाण्याचा प्रयत्न मात्र करत राहीन.

**- नीरजा**

ए-१४, सी.जी. दर्शन, अवधूत नगरजवळ,
शिवाजी मार्ग, दहिसर, (पूर्व), मुंबई ६८
मोबा. : ९९६९८१०८९६

## ओळख । प्रज्ञा दया पवार

**गे**ली पंचवीस-तीस वर्षे सातत्याने कवितालेखन करणाऱ्या नीरजा यांनी मराठी काव्य-प्रवाहात स्वतःची विशिष्ट अशी नाममुद्रा उमटवलेली आहे. त्यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९६० रोजी मुंबईत झाला. पदव्युत्तर शिक्षणानंतर (एम.ए.- इंग्रजी) त्यांनी दीर्घकाळ श्री चिनॉय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, अंधेरी येथे कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन केले आहे. अलीकडेच त्या माटुंगा येथील पोद्दार वाणिज्य महाविद्यालयात रुजू झाल्या आहेत.

नीरजा यांचे आजवर 'निरन्वय' (१९८७), 'वेणा' (१९९४), 'स्त्रीगणेशा' (२००३) आणि 'निरर्थकाचे पक्षी' (२०१०) असे चार कवितासंग्रह प्रकाशित झाले असून त्यांच्या सर्वच संग्रहांना प्रतिष्ठेच्या अनेक मान-सन्मानांनी आणि विविध पुरस्कारांनी गौरविले गेले आहे. कवितेशिवाय कथा आणि स्तंभलेखन हीदेखील त्यांची आस्थेची आविष्कार-क्षेत्रे असून या क्षेत्रातदेखील त्यांचे भरीव असे योगदान आहे. 'जे दर्पणी बिंबले' (२००१), 'ओल हरवलेली माती' (२००६), 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' (२०१२) हे कथासंग्रह आणि 'बदलत्या चौकटी' (२००७) व चिंतनशलाका (२०१०) हे त्यांचे स्तंभलेखन-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. एका कवयित्रीने जाणीवपूर्वक स्वतःच्या क्षमतांचा आणि शक्यतांचा विविध साहित्यप्रकारांच्या संदर्भात घेतलेला शोध म्हणजे त्यांचे हे कथनात्मक लेखन म्हणता येईल.

नीरजा यांनी त्यांच्या लेखन-प्रवासासोबत संस्थात्मक कामाशीही स्वतःला अलीकडच्या काळात जोडून घेतले आहे. ग्रंथाली आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या वतीने चालणाऱ्या अनुवाद सुविधा केंद्राच्या कार्यात त्यांनी त्यांचा महत्त्वपूर्ण असा कृतिशील सहभाग नोंदविला आहे. तसेच अनुवाद सुविधा केंद्राच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या 'माय मावशी' या षण्मासिकाच्या संपादक आहेत.

नीरजा यांनी विविध साहित्यप्रकारांतून जरी लक्षणीय लेखन केलेले असले तरी त्यांची ओळख प्रामुख्याने कवयित्री अशी आहे. 'निरर्थकाचे पक्षी' हा त्यांचा कवितासंग्रह म्हणजे त्यांच्यातल्या कवयित्रीने घेतलेले एक महत्त्वपूर्ण वळण म्हणता येईल. समस्त स्त्री-समूहाच्या वाट्याला आलेले दुय्यमत्व अधोरेखित करणे, शोषणाच्या आदी-कारणांचा वेध घेणे, स्त्रीच्या स्व-भानाचा आणि विश्वभानाचा प्रवास ऐतिहासिक कालपटाच्या अनुषंगाने चित्रित करणे आणि मुख्य म्हणजे पारंपरिक स्त्री-संहितेचे आधुनिक संज्ञेने पुनर्रचन करणे ही नीरजा यांच्या आधीच्या तीन कवितासंग्रहातील केंद्रवर्ती आशयसूत्रे 'निरर्थकाचे पक्षी' या संग्रहातदेखील आढळतात. परंतु 'निरर्थकाचे पक्षी'मधील आशयसूत्रांना जागतिकीकरणाचा गुंतागुंतीचा संदर्भ प्राप्त झाल्याने त्यातील काव्यांतर्गत अनुभवाचा प्रदेश हा अधिक व्यापक, विस्तारशील आणि म्हणूनच अनेकायामी झालेला दिसतो.

नीरजा यांच्या काव्यविषयक जाणिवांच्या जडणघडणीचा संदर्भबिंदू अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'निरन्वय' हा १९८७ मध्ये प्रसिद्ध झाला. याचा अर्थ असा की त्याच्या आधी किमान पाच-दहा वर्षे त्यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली असावी. हा काळ विविध

# आजची आव्हानं **समग्रपणे पेलणारी कविता**

'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा' या संग्रहांतील काही निवडक मोजक्या कवितांचा अपवाद केल्यास
त्यांच्या अनेक कवितांची घडण ही उपरोधाच्या अंगाने झालेली आहे असे दिसते.
ताण, विरोध, उपहास, दंभस्फोट ही त्यांची एकूणच काव्यशैली आहे की काय,
असा प्रश्न पडावा इतकी ती शैली त्यांच्या काव्यगत अनुभवकेंद्रावर प्रभाव गाजविताना दिसते.
मात्र 'निरर्थकाचे पक्षी'मध्ये आपल्या या शैलीला छेद देण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत.
परिणामी यातील काव्यानुभव हा सूक्ष्म,
अनेकरेषीय आणि प्रसरणशील झालेला दिसतो.

वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चळवळींनी व्यापलेला होता. साठोत्तरी साहित्याचे आणि १९७५ नंतर वेगवान झालेल्या स्त्रीमुक्ती चळवळीचे प्रभाव, पडसाद आणि संस्कार यांपासून कुठलीही संवेदनशील व्यक्ती अलिप्त राहणे शक्यच नव्हते. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, भालचंद्र नेमाडे, अरुण कोलटकर, तुळशी परब, मनोहर ओक, वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर यांची व्यवस्थात्मक पेचांची– जगण्यातली अवघी जटिलता पकडणारी सर्जनशीलता आणि प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील आणि मल्लिका अमरशेख यांची समस्त स्त्री-समूहाच्या वाट्याला येणाऱ्या दाहक वास्तवाचे अर्थनिर्णयन करणारी भेदक, मर्मग्राही अन्वेषणदृष्टी त्या काळात गांभीर्यपूर्वक काही लिहू पाहणाऱ्या कुठल्याही लिहित्या माणसाप्रमाणे नीरजा यांनाही पूर्वपरंपरेच्या स्वरूपात लाभलेली आहे. एकूणात महत्त्वपूर्ण अशा वाङ्मयीन आणि सांस्कृतिक स्थित्यंतराच्या मूल्यात्मक पार्श्वभूमीवर नीरजा यांनी त्यांच्या काव्य-लेखनाचा ओनामा केला आहे.

प्रा.गंगाधर पाटील यांनी नीरजा यांच्या पहिल्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिताना म्हटले आहे, 'या काव्यात्म अनुभवविश्वात प्रामुख्याने तीन प्रकारची अनुभवांगे सामावलेली आहेत. एक- प्रेयविषयक अनुभव, दोन- स्त्रीच्या स्वत्वशोषणाविषयीचे अनुभव, तीन- सर्वसामान्य जीवनाविषयीचे चिंतनगर्भ अनुभव.' ('निरन्वय'- प्रस्तावना, पृ. ५) त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून व्यक्त होणारे हे काव्यात्म अनुभवविश्व नंतरच्या 'वेणा' आणि 'स्त्रीगणेशा' या कवितासंग्रहात प्रामुख्याने स्त्रीकेंद्री जाणिवांचा ऐतिहासिक आणि वर्तमानकालीन पट मांडतामांडता, 'निरर्थकाचे पक्षी' या संग्रहात मात्र अधिक विस्तृत अवकाश धारण करताना दिसते याचे मुख्य कारण जागतिकीकरणाच्या निर्घृण वास्तवाच्या व्यामिश्रतेला त्या सामोऱ्या गेल्या आहेत.

नीरजा यांची सुरुवातीपासूनची कविता प्रामुख्याने पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणारी आहे. साहजिकच त्यांच्या कवितेचा स्व-भाव बंडखोर आहे. उपहास, उपरोध आणि आक्रमकता ही त्यांच्या काव्य-भाषेतील महत्त्वाची हत्यारे आहेत आणि त्याचे अतिशय चपखल, परिणामकारक उपयोजन त्यांनी केले आहे.

स्त्री-पुरुष नातेसंबंधात सत्तास्थानाचे राजकारण निहित असते आणि जात, वर्ग, धर्म अशा संरचनांप्रमाणेच पितृसत्ता (Patriarchy) नावाची संरचना प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर मानवी समाजात कार्यप्रवण असते हे भान नीरजा यांच्या समग्र काव्य-विचारामागे सतत जागे राहिलेले आहे. अशा प्रस्थापित वर्चस्ववादी पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेला नाकारणारी आणि स्त्रीच्या आत्मशोधाचा प्रवास विविध कोनांमधून पकडू पाहणारी नीरजा यांची कविता मराठीतील समूहलक्ष्यी प्रवाहाशी आंतरिक नाते जोडताना दिसते.

स्त्रीला कायमच पुरुषाचे उपांग मानण्याच्या सनातनी वृत्तीला ठोकरणारी भाषा नीरजा यांच्या कवितेतून सतत ध्वनित होत असते. स्त्री-प्रतिमांचे सांकेतिक, साचेबंद चित्रण का केले जाते, कसे केले जाते, याची परखड शहानिशा हे त्यांच्या कवितागत अनुभवाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. स्त्रियांच्या दुःखदायी कहाण्या पराभूत नियतीवादी दृष्टिकोनातून मांडणे अथवा स्त्रियांच्या कर्तेपणाला, शौर्याला पोवाडेसदृश्य जयजयकारात बंदिस्त करणे म्हणजे स्त्री-केंद्री जाणिवेतून लिहिणे अशी निखालस स्त्रीवादाच्या विरोधात जाणारी भूमिका नीरजा घेत नाहीत कारण लिंगभावाच्या जडणघडणीशी (Gender construction) असलेला व्यवस्थात्मक संदर्भ बेदखल करून स्त्री अथवा पुरुषाबाबतचे कोणतेही विधान करता येत नाही, याची पक्की जाणीव कवयित्री नीरजा यांना रोमँटिक होण्यापासून वाचवते.

'निरर्थकाचे पक्षी' या कवितासंग्रहातून नीरजा यांनी उपरोक्त आशयसूत्रांना अधिक मोठ्या पटलावर नेऊन एक कवी म्हणून होत असलेल्या विकासक्रमाच्या खुणा सिद्ध केल्या आहेत. स्त्रीकेंद्री आशयसूत्रांसोबत भोवतालाचे तीव्र भान, अंतर्विरोधात्मक वर्तमान वास्तवाचे तपशील आणि अशा भयकारी तपशीलाच्या दाबाखाली जगणारी सर्वच स्तरातली माणसे, त्यांचे जगणे 'निरर्थकाचे पक्षी'मधून प्रतिमांकित झाले आहे. विशेषतः जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचा संत्रस्त कोलाहल, मूलतत्त्ववादात आणि हिंसेत होणारी त्याची अपरिहार्य परिणती, अध्यात्माच्या भरगच्च बाजारपेठांमधून ईश्वराला प्राप्त झालेले विक्रीमूल्य आणि त्यातली हरवलेली करुणा, स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधांत आलेली विपर्यस्तता, स्त्री-पुरुषांचे स्व-अस्तित्वविषयक भौतिक स्तरावरील वाढते पेच, मॉल-संस्कृतीचे होत असलेले उदात्तीकरण आणि पृथ्वीतलावरच्या एकूणच मानवी समुदायाच्या सभ्यतेचा, मूल्यांचा होणारा विनाश आणि दिवसेंदिवस ठळक होत जाणारी माणसाची केवळ ग्राहककेंद्री ओळख आणि त्यातून येणारी परात्मतेची, विखंडिततेची भावना याचा प्रत्ययकारी कोलाज 'निरर्थकाचे पक्षी'मधून प्रतिमित झाला आहे.

उपरोक्त अनेक विषयांना 'निरर्थकाचे पक्षी'मधील कविता भिडताना दिसतात, म्हणजे सध्याचे ज्वलंत इश्यूज डोळ्यांसमोर ठेवून त्याची विषयवार यादी वगैरे बनवून केवळ लिहायच्या म्हणून लिहिलेल्या आणि वर्णनात्मक पृष्ठस्तरावरच थांबून राहणाऱ्या असे या कवितांचे स्वरूप नाही. 'निरर्थकाचे पक्षी'मधील व्यापक आशयसूत्रांना सेंद्रिय

एकात्मता लाभते ती नीरजा यांची कवी म्हणून असलेली जीवनदृष्टी, कलादृष्टी, कविता या साहित्य प्रकाराबाबतची त्यांची समझदारी आणि प्रत्यक्ष जीवनवास्तवाचा या सर्वांशी असलेला परस्परसंबंध यांतून. नीरजा या सर्व घटकांना कशा सामोऱ्या जातात; उपलब्ध आशयद्रव्याचे नेमके कसे उपयोजन करतात आणि कविता हा साहित्यप्रकार किती सजगतेने हाताळतात हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.


'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा' या संग्रहातील काही निवडक मोजक्या कवितांचा अपवाद केल्यास त्यांच्या अनेक कवितांची घडण ही उपरोधाच्या अंगाने झालेली आहे असे दिसते. ताण, विरोध, उपहास, दंभस्फोट ही त्यांची एकूणच काव्यशैली आहे की काय, असा प्रश्न पडावा इतकी ती शैली त्यांच्या काव्यगत अनुभवकेंद्रावर प्रभाव गाजविताना दिसते. मात्र 'निरर्थकाचे पक्षी'मध्ये आपल्या या शैलीला छेद देण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत. परिणामी यातील काव्यानुभव हा सूक्ष्म, अनेकरेषीय आणि प्रसरणशील झालेला दिसतो. व्यक्तिलक्ष्यी, समूहलक्ष्यी, सौंदर्यलक्ष्यी असे विभाजन करता येऊ नये अशी विलक्षण सरमिसळ करून त्यांनी आपल्या कवितेची अर्थवत्ता विस्तीर्ण केली आहे. त्यांची सुरुवातीपासूनच साधी सोपी असलेली कविता 'निरर्थकाचे पक्षी'मध्येही साधी सोपी आहे; परंतु हा साधेसोपेपणा इथे सुलभ न होता काळाशी संवादी राहून अवघडपणाकडे वाटचाल करतो.

या संग्रहातील ग्लोबल कविता १ व २ मधून एकूणच सांस्कृतिक अध:पतनाचा स्वर प्रकट होतो. जागतिकीकरणाच्या तथाकथित प्रगत वास्तवातले स्त्रीवास्तव किती बदतर आहे हे त्या दाखवून देतात. उदाहरणार्थ,

बाईला केवळ शरीर असतं हे तुमचं तत्त्वज्ञान
नाही पोचू देणार तिच्या मेंदूपर्यंत तुम्हांला
ह्या ग्लोबल गावातही.
विक्रीला काढलेल्या अनेक वस्तूंपैकी
एक वस्तू बनवता आहात बाईला
आणि ज्याम मजा येते म्हणून
आनंदानं साजरा करताहात तुमचा पुरुषार्थ (पृ. १५४)

'स्व'ची आदिम ओळख व्यक्तविणारी या संग्रहातील कविता (पृ. १४७) तर एकूणच स्त्रियांच्या असतेपणाला, त्यांच्या श्रमाला, इतिहासातल्या त्यांच्या स्थानाला कसे अदृश्य करण्यात आले आहे याचा नितांतसुंदर अल्पाक्षरी पण नेमका मागोवा घेते.

'निरर्थकाचे पक्षी'मधील भाषिक संवेदन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. भावनिकता आणि वैचारिकता यांचा सांधा नीरजा यांनी संपूर्ण संग्रहात कसोशीने सांभाळलेला आहे. व्यक्तिलक्ष्यी आणि समूहलक्ष्यी अभिव्यक्ती एकमेकांत खेळत्या ठेवून त्यांतून नाट्यमयता निर्माण करणे, अनोखे शब्द घडवणे, शब्दांची अपरिचितता दर्शविणे, शब्द-साहचर्य तत्त्वाला जाणीवपूर्वक विचलित करणे अशा भाषिक लकबी या संग्रहातील काव्याशयाला भावसमृद्ध आणि अर्थसमृद्ध बनवितात.




**प्रज्ञा दया पवार**
एफ ७०४, इटर्निटी कॉंप्लेक्स,
तीन हात नाका, ठाणे ४००६०४
Mob.: 9869480141